॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com



# अहिल्यानगर शहरात अतिवृष्टी

● **नगर । वीरभूमी–**

अजून मान्सूनच्या पावसाला सुरुवात झालेली नाही. अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर पडतो आहे. या पावसानेच संपूर्ण शहराची दाणादाण उडाली असून शहराचा नरक झाला आहे. मान्सून पूर्वीच शहर पाण्याखाली गेले आहे. ही नैसर्गिक आपत्ती नव्हे तर शहर ढिसाळ नियोजनाचे बळी ठरत आहे. नियोजन शून्य कारभार करणाऱ्या मनपा प्रशासनाने अहिल्यानगरकरांना प्रवासासाठी होड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी खोचक जाहीर मागणी ठाकरे शिवसेनेच्या वतीने शहरप्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

काळे यांच्या या अनोख्या मागणीची समाज माध्यमांवर चांगलीच चर्चा सुरू आहे. काळे यांनी म्हटले आहे, सीना नदीवरील नगर कल्याण रोडवरील प्रस्तावित पुलाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. अनेक वेळा याची पाहणी झाली. आश्वासने दिली गेली. मात्र प्रत्यक्षात आजवर कामाला सुरुवात नाही झाली. विशेषतः वारुळाचा मारुती, नेप्ती नाका, कायनेटिक चौका जवळील सीना नदीवरील पूल या परिसरामध्ये काही ठिकाणी पुलाच्या वरून तर काही ठिकाणी पूलाला लागून पाणी वाहते आहे.

सीना नदी पात्राच्या खोलीकरण व रुंदीकरणाचा विषय देखील प्रशासन मार्गी लावू शकलेले नाही. सीना आता नदी राहिली नसून त्याचा नाला झाला आहे. या पात्रात बहुतांश ठिकाणी प्रचंड मोठ्या प्रमाणावर जलपर्णी वनस्पती पसरली आहे. नाले सफाई मोहिमेत याची स्वच्छता होण्याची गरज होती. मात्र हे काम अपूर्ण आहे. परिणामी नदीला पूर आला असून हजारो नागरिकांचा मुख्य शहराशी असणारा संपर्क तुटला असून दळणवळण थांबले आहे. शहराच्या बाजारपेठेसह सावेडी, केडगाव, बोल्हेगाव, नागापूर सर्वच उपनगरांमध्ये रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरिकांना गाडीवरून प्रवास करणे अशक्य होत आहे. जनजीवन, दळणवळण सुरळीत चालायचं असेल तर आता एकच पर्याय उरला आहे. मनपा प्रशासनाने तात्काळ नागरिकांना होड्या उपलब्ध करून द्याव्यात, अशी खोचक जाहीर मागणी काळे यांनी केली आहे.

## वीज पडून चार जनावरांचा मृत्यू

■ अवकाळी पावसात विजेचा जोर वाढल्याने चार शेतकऱ्यांच्या गायी जागीच मृत्युमुखी पडल्या. लोणी येथील परमेश्वर शेंडकर, जवळा येथील महादेव वाळुंजकर, मोहरी येथील राहुल भिसे आणि दिघोळ येथील सुदाम गिते यांच्या गायी मृत झाल्याची घटना घडली आहे. जनावरे ही शेतकऱ्यांची उपजीविकेची महत्त्वाची साधने असल्याने यामुळे कुटुंबांवर आर्थिक संकट ओढावले आहे. बाधित भागांना भेटी देणे सुरू केले आहे. मात्र, शेतकऱ्यांनी नुकसानभरपाईसाठी तत्काळ पंचनामे करून मदतीची मागणी केली आहे. तालुक्यातील कृषी उत्पन्नावर आधारित अर्थव्यवस्थेला हा पाऊस मोठा झटका असून, शासनाने या शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत व पुनर्वसन योजना जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

## भारतावर डोळा टाकणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही : पंतप्रधान मोदींचा इशारा

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

पाकिस्तानला शांततेत राहण्याचा, त्यांच्या वाट्याचे अन्न खाण्याचा इशारा देण्यात आला होता, अन्यथा माझ्या गोळ्या आहेत. आपण शांतता आणि समृद्धीचा मार्ग निवडला आहे. पाकिस्तानातील नागरिकांनो आणि विशेषतः तिथल्या मुलांनी मोदी काय म्हणतात ते काळजीपूर्वक ऐका, तुमचे सरकार आणि तुमचे सैन्य दहशतवादाला पाठिंबा देत आहे. भारतावर डोळा टाकणाऱ्या कोणालाही कोणत्याही किंमतीत सोडले जाणार नाही. पाकिस्तान सरकार आणि लष्करासाठी दहशतवाद हा पैसा कमावण्याचे साधन बनला असल्याचे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानच्या युवकांना योग्य मार्ग निवडण्याचे आवाहन केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय गुजरात दौऱ्यावर आहेत. सोमवारी सकाळी मोदी प्रथम वडोदरा, नंतर दाहोद आणि आता भूज येथे पोहोचले. त्यांनी तिन्ही ठिकाणी रोड शो केला. दाहोद आणि भुज येथे जाहीर सभांना संबोधित केले.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी भूजमध्ये ५३,४०० कोटी रुपयांच्या ३१ प्रकल्पांची पायाभरणी आणि ई-उद्घाटन देखील केले. यामध्ये खावडा रिन्यूएबल एनर्जी पार्कचे ट्रान्समिशन प्रकल्प, तापी जिल्ह्यातील औष्णिक वीज प्रकल्प, कांडला बंदर आणि रस्ते, पाणी, वीज प्रकल्पांशी संबंधित योजनांचा समावेश आहे. भारतीय लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांचे कुटुंबीय वडोदरा येथे पंतप्रधान मोदींच्या रोड शोमध्ये सामील झाले.

## जामखेड तालुक्याला पावसाने झोडपले

● **जामखेड । वीरभूमी–**

गेल्या पंधरा दिवसांपासून जमखेड तालुक्यात मान्सून पूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. सोमवार व मंगळवारी तालुक्यात अनेक ठिकाणी धुवाधार पाऊस झाला. त्यामुळे गावोगावच्या ओडे नाले वाहत आहेत तालुक्यात २८० मिलीमिटर पावसाची नोंद झाली तर आज बुधवारी झालेल्या पावसामुळे जामखेड तालुक्यातील कुसडगांव येथे जोरदार पाऊस झाला त्यामुळे गावाला तळ्याचे स्वरूप आले आहे.



जामखेड तालुक्यात मे महिन्याची सरासरी ३५.३ मिलिमीटर आहे. मे महिन्यात आतापर्यंत सरासरी तब्बल २८० मिलिमीटर पाऊस झाला आहे. सलग पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. सकाळ उजाडताच आभाळ दाटून येते, दुपारपर्यंत हलका किंवा मध्यम पाऊस, आणि रात्रीच्या वेळी अचानक मुसळधार पावसाची बरसात या पद्धतीच्या हवामानामुळे शेतकऱ्याचा शेतातला एकही दिवस समाधानाने जात नाही. परिणामी, बळीराजा अक्षरशः वैतागला आहे.

पावसामुळे अनेक घरांचे छप्पर उडाले, भिंती कोसळल्या आणि पावसाचे पाणी घरात शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे नुकसान झाले आहे. जामखेड येथील डी. आर. टेलर्स दुकानाचा स्लॅबचे कोसळले. खर्डा येथील अश्रू मोरे, नान्नज येथील ज्ञानेश्वर फरतडे, चोंडी येथील अक्षय सोनवणे, शिऊर येथील तारामती पवार यांच्या घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तालुक्यातील ३० हून अधिक गावांमध्ये अवकाळी पावसाचा जबरदस्त दणका बसला आहे.

# अशोक सराफ यांना पद्मश्री पुरस्कार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय काम करणा-या ६८ मान्यवरांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कार असणाऱ्या 'पद्म पुरस्कारां' ने आज सन्मानित करण्यात आले. यात महाराष्ट्रातील सहा मान्यवरांचा समावेश आहे.

राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती यांच्या हस्ते आज दुस-या व अंतिम टप्यात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमात उपराष्ट्रपती जगदीप धनकड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, तसेच अन्य केंद्रीय मंत्रीगण व केंद्र शासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या पुरस्कार समारंभात राज्यातील सहा मान्यवरांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ .मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रातील योगदानासाठी 'पद्मभूषण पुरस्कार' (मरणोत्तर) तर अशोक



सराफ, अच्युत पालव, अश्विनी भिडे-देशपांडे यांना कला क्षेत्रातील अमूल्य योगदानासाठी तसेच कृषी क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सुभाष शर्मा व वैद्यकीय क्षेत्रातील उत्तम कार्यासाठी डॉ. विलास डांगरे यांना पद्मश्री पुरस्काराने राष्ट्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

राज्याचे माजी मुख्यमंत्री तसेच माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांना सार्वजनिक क्षेत्रात अमूल्य योगदानासाठी 'पद्मभूषण' (मरणोत्तर) पुरस्कारने आज गौरविण्यात आले. हा पुरस्कार त्यांचे सुपुत्र श्री. उन्मेश जोशी यांनी स्विकारला. डॉ. जोशी यांनी पाच दशकाच्या राजकीय कारकिर्दीत मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक,महापौर,आमदार,मुख्यमंत्री,केंद्रीय मंत्री आणि लोकसभा अध्यक्ष या सर्व जबाबदाऱ्या यशस्वीरित्या पार पाडल्या. सन १९९५ मध्ये ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर २००२ ते २००४ या कालखंडात त्यांनी लोकसभा अध्यक्षपद भूषवले. रायगड जिल्ह्यातील नांदवी या गावी जन्मलेल्या जोशी यांनी शिक्षण, शिस्त, आणि कार्यक्षम नेतृत्वाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांना मरणोत्तर पद्मभूषण या मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले.

## जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस : आयएमडी

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

आगामी जून महिन्यात देशात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, जो दीर्घकालीन सरासरीच्या १०८ टक्के असू शकतो, अशी माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) दिली. मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा आणि लगतच्या प्रदेशांचा समावेश होतो. बहुतेक पाऊस नैऋत्य मान्सून दरम्यान पडतो आणि हा प्रदेश शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतो.

दरम्यान भारत सरकारने आज प्रगत भारत फोरकास्ट सिस्टीम (इत्रड) लाँच केली. केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी ते देशाला सुपूर्द केले. ही प्रणाली पंचायत पातळीपर्यंत आपत्ती व्यवस्थापन, शेती, पाणी व्यवस्थापन आणि सार्वजनिक सुरक्षेत मदत करेल.

हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितले की, मध्य आणि दक्षिण भारतात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. वायव्य भारतात सामान्य पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर ईशान्य भारतात सामान्यपेक्षा कमी पाऊस पडू शकतो.

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव एम रविचंद्रन यांनी सांगितले की, चालू हंगामात मान्सूनच्या मुख्य क्षेत्रात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडण्याची अपेक्षा आहे. आजपासून भारत फोरकास्ट सिस्टीमचा वापर केला जाईल. आता हवामान अंदाज पूर्वीपेक्षा अधिक स्थानिक आणि अचूक असेल. पूर्वी प्रत्युष हा सुपर कॉम्प्युटर वापरला जात होता, परंतु आता नवीन सुपर कॉम्प्युटर अर्का वापरला जाईल. ही प्रणाली ४० डॉप्लर रडारमधून डेटा घेते आणि भविष्यात ती १०० रडारपर्यंत वाढवली जाईल.

# SPOT NEWS

## निमगाव वाघा येथे आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती प्रशिक्षण

**नगर । वीरभूमी –**
तणावमुक्त व आनंदी जीवन जगण्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे द आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने तर स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्याने आनंद अनुभूती या सहा दिवसीय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे प्रारंभ गुरुवारी दि. २९ मे रोजी होणार असून, यामध्ये पंचक्रोशीतील ग्रामस्थांना सहभागी होण्याचे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे, डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै.नाना डोंगरे व विशाल गावडे यांनी केले आहे. गुरुवार पासून गावातील नवनाथ मंदिराच्या सभा मंडपात संध्याकाळी ५:३० ते ८:३० वाजे पर्यन्त हे शिबीर होणार आहे. यामध्ये योग, प्राणायाम, सुदर्शन क्रीया व ध्यानबाबत प्रशिक्षण देऊन आयुष्यातील ताण, तणाव मुक्तीसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. तर मानसिक व अध्यात्मसंदर्भात तज्ञ मंडळी यांचे व्याख्यान होणार आहेत. वयोवर्षे १८ पुढील युवक-युवतींसह सर्व ग्रामस्थांना या प्रशिक्षण शिबीरात सहभागी होता येणार असून, याचा समारोप मंगळवारी दि.०३ जून रोजी होणार आहे. शिबीरात सहभागी होण्यासाठी रामचंद्र लोखंडे ९१३०१३९६००, पै. नाना डोंगरे ९२२६७३५३४६, विशाल गावडे ९४०३३१८७०५ यांना संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

## सरस्वती मंदिर नाईट स्कूलचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
शहरातील नव विद्या प्रसारक मंडळाच्या सरस्वती मंदिर नाईट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावी (एस.एस.सी.) बोर्डाच्या परीक्षेत उत्तम कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. दिवसा पूर्ण वेळ काम करून, रात्री शाळेत येऊन अपूर्ण शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या आयुष्यातील या महत्त्वाच्या टप्प्यावर यश मिळवले आहे. या यशानंतर शाळेच्या वतीने दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक पांडुरंग गवळी, वर्गशिक्षिका देवका लबडे, शिक्षक विलास शिंदे, विणा कुऱ्हाडे, महेंद्र म्हसे तसेच शिक्षकेतर कर्मचारी राजू भुजबळ आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक पांडुरंग गवळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हणाले की, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत शिक्षण घेणे हे फारच कठीण काम असते. मात्र या विद्यार्थ्यांनी दुहेरी कर्तव्य पार पाडत आपल्या मेहनतीचे फळ मिळवले आहे. हे यश इतरांसाठीही प्रेरणादायी आहे. दहावी ही आयुष्यातील महत्वाची पायरी असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हे विद्यार्थी सज्ज झाले असून, त्यांनी भविष्यातील योग्य दिशा ठरवून वाटचाल करण्याचे आवाहन केले. सरस्वती मंदिर नाईट स्कूलचा यंदाचा दहावीचा निकाल ६६.६६ टक्के लागला आहे. या निकालामध्ये ज्योती मनोहर टिपरे हिने ६१.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या पाठोपाठ ललिता दगडू कांबळे हिने ५९.२०% गुण मिळवून द्वितीय स्थान मिळवले तर मनीषा सूर्यभान कांबळे हिने ५७% गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. संस्थेचे पदाधिकारी डॉ. रवींद्र साताळकर, डॉ. निलेश वैकर, डॉ. अनिरुद्ध गीते, मंगेश धर्माधिकारी आदी विश्वस्तांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पिंपळगाव खांड जलाशयाच्या पाण्यावरुन वाद पेटणार

### पठारावरील गावांना पाणी देण्यास विरोध । पाईप घेऊन आलेले कंटेनर परत पाठवले

**अकोले । वीरभूमी –**
तालुक्यातील पिंपळगाव खांड लघुपाटबंधारे जलाशयातून संगमनेर तालुक्यातील पठार भागातील १३ गावांसह १८ वाड्या-वस्त्यांसाठी जलजीवन मिशनअंतर्गत मंजूर पाणी योजनेसाठी लोखंडी पाईपने भरलेले चार कंटेनर रविवारी (२५ मे) दुपारी दीडच्या सुमारास आले. तालुक्यातील शिदवड, लिंगदेव मार्गावरील ठाकरवाडी येथे थांबले. लोखंडी पाईप वाहतूक करणाऱ्या एका कंटेनरमधून जेसीबीच्या साहाय्याने ठाकरवाडी रस्त्यालगत ३० पाईप उतरून झाले. प्रत्येक कंटेनरमध्ये ६०, असे सुमारे २४० पाईप आले होते. पिंपळगाव खांड प्रकल्पातून पठारावरील १३ गावांसह १८ वाड्या-वस्त्यांवरील पाणीयोजनेचे असल्याची माहिती मिळताच लिंगदेव, लहित, चास, बोरी, कोतूळ, वाघापूर, पिंपळगाव खांड परिसरातील लोक तेथे जमा झाले. हे लोखंडी पाईप उतरविण्यास त्यांनी विरोध केला.



संगमनेरचे आ. अमोल खताळ यांनी घटनास्थळी धाव घेऊन लोकांसोबत चर्चा केली. मात्र, त्यांचे मतपरिवर्तन करण्यात त्यांना अपयश आले. शेवटी संगमनेर तालुक्यातील पठार भागांसाठी आलेले सर्व पाईप न उतरविताच माघारी पाठवण्यात आले. त्यामुळे पिंपळगाव खांड प्रकल्पातून पठारावरील गावांना जलजीवन मिशनअंतर्गत पाईपलाईन करण्यास मुळा खोऱ्यातून तीव्र विरोध होत असून, पिंपळगाव खांडचा पाणीप्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याच प्रश्नावरून ७ नोव्हेंबर २०२३ रोजी सुगाव बुद्रूक येथे कोल्हार-घोटी राज्यमार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.

सीताराम पाटील गायकर, उल्हास गोडसे, भाजप नेते गिरजाजी जाधव, लिंगदेवचे तत्कालीन सरपंच अमित घोमल, सीताराम लांडे, मास्ती कानवडे, डी. बी. फाफाळे, रेश्मा गोडसे यांनी संगमनेर तालुक्यातील पठारावर पाणी नेण्यास तीव्र विरोध केला. पिंपळगावखांड प्रकल्पातून अतिरिक्त पाणी उपलब्ध होत नाही, तोपर्यंत पठारावरील गावांना एक थेंबही पाणी जाऊ देणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला.

सेवा निवृत्त प्रशासकीय अधिकारी बी. जे. देशमुख म्हणाले की, लोकप्रतिनिधींची भूमिका पिंपळगाव खांड धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांऐवजी संगमनेर तालुक्यातील पठार भागातील लोकांबरोबरच राहण्याची राहिली आहे.

यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपतालुकाप्रमुख प्रभाकर फाफाळे म्हणाले, की कंटेनरमधून हे पाईप उतरविण्यास का सांगत आहात? पिंपळगाव खांड जलाशयात पाणी कमी आहे. आहे तेच पाणी शेतीला अपुरे पडते. काहीही झाले, तरी पाईप आम्ही उतरू देणार नाही. योजनेसाठी स्वतंत्र पाणीसाठा तयार करावा, असे ते म्हणाले.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि खाद्यतेल अभियानांतर्गत शेतकऱ्यांनी

## अनुदानित बियाणे व पीक प्रात्यक्षिकासाठी अर्ज करावेत : शशिकांत गांगुर्डे

**श्रीगोंदा । वीरभूमी –**
राष्ट्रीय अन्नसुरक्षा आणि पोषण अभियान तसेच राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, सोयाबीन, सूर्यफूल आणि भुईमूग या पिकांच्या सुधारित आणि संकरीत वाणांचे प्रमाणित बियाणे वितरण आणि पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना उत्पादकता वाढवण्यासाठी आणि बियाणे बदलाच्या महत्त्वासाठी या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन श्रीगोंदा तालुका कृषी अधिकारी शशिकांत गांगुर्डे यांनी केले आहे.

या योजनेत प्रमाणित बियाणे योजनेत प्रति शेतकरी किमान ०.२० हेक्टर ते कमाल १ हेक्टरपर्यंत आर्थिक सहाय्य मिळणार आहे तर पीक प्रात्यक्षिक योजनेत शेतकरी गटांनी ३१ मार्च २०२४ पूर्वी नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. यामध्ये आत्मा, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोत्ती अभियान, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोत्ती अभियान, महिला आर्थिक विकास महामंडळ आणि नाबार्ड यांचा समावेश आहे.



जिल्ह्यातील शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी आणि सहकारी संस्थांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी दि. २९ मे २०२५ पर्यंत mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन अर्ज सादर करावेत. तर अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन पिकांची उत्पादकता वाढवावी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन श्रीगोंदा तालुका कृषी अधिकारी शशिकांत गांगुर्डे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावे : अशोक मुथा

**नगर । वीरभूमी–**
अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी (एस.एस.सी.) व बारावी (एचएससी) बोर्डाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. या दोन्ही शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.



भाऊसाहेब फिरोदिया मधील इयत्ता दहावी बोर्डाचा १००% निकाल लागाल. यामध्ये ६१ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले. तर गणित आणि संस्कृतमध्ये प्रत्येकी दोन विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण मिळवले आहे. तसेच रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचा इयत्ता दहावीचा निकाल ९९.३% निकाल लागला. ११३ विद्यार्थ्यांनी ७० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवले. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा निकाल १००%, तर कला शाखेचा ८८% निकाल लागला आहे.

भाऊसाहेब फिरोदिया शाळेत झालेल्या गुणगौरव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार समितीचे सदस्य भूषण भंडारी, भाऊसाहेब फिरोदियाचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, रूपीबाई बोराचे मुख्याध्यापक अजय बारगळ आदींसह शालेय शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अशोक मुथा म्हणाले की, शिक्षणातून विद्यार्थ्यांचे उज्वल भवितव्य घडणार आहे. विद्यार्थ्यांनी ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करावे. विद्यार्थ्यांच्या यशात शाळेतील गुरुजनांचा व पाठबळ देणाऱ्या आई-वडिलांचा मोठा वाटा असून, त्यांचा मान-सन्मान राखावा. मोठे झाल्यावर त्यांना कधीही विसरू नये, असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी सरस्वती पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात सचिन पवार यांनी दोन्ही शाळेतील वाढता गुणवत्तेचा आलेख सादर केला. विद्यार्थ्यांच्या सत्काराच्या नावांची घोषणा समृद्धी बिबवे यांनी केली. या गौरव सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते भाऊसाहेब फिरोदिया मधील इयत्ता दहावी आणि रूपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलच्या दहावी आणि बारावी बोर्डातील गुणवत्ता यादीत चमकलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी जोशी यांनी केले तर रवींद्र पंडित यांनी आभार मानले.

# मोहटे येथील रेणुका विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांकडून आठवणींना उजाळा

### दहावीच्या २०००-२००१ बॅचच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**पाथर्डी । प्रतिनिधी–**
धावपळीच्या जीवनातून वेळ काढत तालुक्यातील मोहटे येथील रेणुका विद्यालयातील सन २०००- २००१ च्या बॅचच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी तब्बल २५ वर्षांनी एकत्र येत शाळेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. एक दिवस शाळेसाठी, शाळेतील आठवणींसाठी या संकल्पनेने माजी विद्यार्थ्यांनी शाळेत बसून शिक्षणाचे धडेही गिरवले आहेत. शालेय जीवनात शिक्षकांनी केलेले संस्कार आणि लावलेली शिस्त कधीही विसरता येणार नाहीत.त्यातून त्यांच्याप्रती आदरभावना व्यक्त करण्याचा प्रयत्न माजी विद्यार्थ्यांनी या संकल्पनेच्या माध्यमातून केला.

शाळा ही प्रत्येकाच्या जीवनात आई-वडीलांनंतर संस्काराची शिदोरी आणि उज्ज्वल भविष्याची वाट दाखवणारी असते.ज्या शाळेत आपण शिकलो,मोठे झालो ती शाळा आणि त्या शाळेच्या आठवणी आयुष्यात कधीही विसरल्या जात नाहीत हे सत्य आहे.याच पार्श्वभूमीवर रेणुका विद्यालय मोहटे येथील सन २०००-०१ मध्ये दहावीत असलेले माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र येत गेट-टुगेदर चा कार्यक्रम मोहटे येथील रेणुका विद्यालयात आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बाबासाहेब दहिफळे हे होते.

यावेळी शिक्षक भाऊसाहेब पालवे, ईश्वर गायकवाड, रामदास दहिफळे, रामदास भाबड, शामराव दहिफळे, पवार सर आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचा यथोचित सन्मान करत शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली. प्रत्येक विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व आपण सध्या काय करत आहोत,याची माहिती दिली. ही माहिती देताना सर्व विद्यार्थी खूप आनंदात होते. यावेळी ज्ञानेश्वर फुंदे, महादेव दहिफळे, राजेंद्र दहिफळे, जालिंदर दहिफळे, प्रकाश बेळगे, बाळासाहेब खेडकर, ईश्वर दहिफळे, दिनकर दहिफळे, देविदास दहिफळे, पांडुरंग नागरे, अंबादास भाबड, अंकुश खेडकर, शोभा भंडारी, स्वाती पालवे, इंदू नागरे, कल्पना खेडकर, शीला दहिफळे, कावेरी खेडकर, सावित्री खाडे आदी उपस्थित होते.

त्यानंतर २५ वर्षातनंतर पुन्हा एकदा एकत्र आलेल्या काही नव्या मित्र मैत्रिणींनी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेतील मस्ती, एकत्रितपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी मनसोक्त गप्पा मारल्या. या गप्पांच्या ओघात सर्वजण आपण इतके मोठे झालो हे विसरून गेले होते. यावेळी कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी भाऊसाहेब किसनदेव दहिफळे यांनी



मेहनत घेतली. यावेळी पुढच्या वर्षी पुन्हा भेटण्याचा निर्धार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुण दहिफळे, सूत्रसंचालन आजीनाथ आव्हाड तर आभार मोहन दहिफळे यांनी मानले.

## SPOT NEWS

### साई द्वारका ट्रस्टचे रुग्णसेवेचे कार्य उल्लेखनीय : ना.विखे पाटील

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

पालकमंत्री कार्यालय येथे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते खा. सुजयदादा विखे पाटील यांच्या प्रयत्नातून श्री साईद्वारका सेवा ट्रस्ट ला मिळालेल्या रुग्णवाहीकेचे नुतनीकरण केल्याबद्दल लोकार्पण सोहळा पार पडला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, नगरसेवक निखिल वारे, रामदास आंधळे, संजय ढोणे, अजय चितळे, सतिश शिंदे, पल्लवी जाधव, रविंद्र बारस्कर, मनोज कोतकर, मनोज ताठे, करण कराळे, संपत नलावडे, भरत ठुबे, अमोल निस्ताने, राहुल मुथा आदी उपस्थित होते. ना.राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, शहरातील नागरिक, गरोदर महिला व गरजू रुग्णांना वेळेत आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी यादृष्टीने आरोग्य सेवेच्या बळकटीकरणावर भर देण्यासाठी खा.सुजय विखे पाटील यांनी श्री साईद्वारका सेवा ट्रस्ट ला रुग्णवाहीका उपलब्ध करुन दिली होती.ॲड.धनंजय जाधव यांच्या श्री साईद्वारका ट्रस्टचे कार्य उल्लेखनीय असून ट्रस्टच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्यामुळे त्यांच्या कार्याला चालना मिळावी यासाठी त्यांना रुग्णवाहीका उपलब्ध करून दिली होती ती त्यांनी योग्यप्रकारे चालवली व आता त्यात काळानुसार बदल केले आहेत. यावेळी बोलताना ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, अनेक वेळा गोरगरीब नागरिकांना घरीच त्रास होतो अशा वेळी रुग्णवाहिकेसाठी पैसेही नसतात मात्र अशा रुग्णांच्या नातेवाईक मित्रांनी फोन केला तर त्यांना दवाखान्यापर्यंत घेऊन जाण्याचे जबाबदारी श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट माध्यमातून उपलब्ध असणारी रुग्णवाहिका करत असून आतापर्यंत सातशे ते आठशे रुग्णांना सेवा देण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये रुग्णांना दवाखान्यापर्यंत पोहोचणे ही महत्त्वाची गरज असल्याने ती सेवा अल्पदरात खासदार सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून मिळालेल्या रुग्णवाहिकेमुळे आम्ही देत आहोत. श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट हे सर्वसामान्यांसाठी कार्यरत असून त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी मरुग्ण सेवा हीच ईश्वर सेवाफ आणि मजनसामान्यांची सेवा हाच धर्मफ या तत्वांवर चालणारे असून नेहमीच सर्वसामान्यांसाठी काम करीत राहील असे याप्रसंगी स्पष्ट केले.

### चर्मकार महासंघाच्या नगर तालुका अध्यक्षपदी केदारे; जिल्हा कार्याध्यक्षपदी शिंदे

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तसेच माजी



समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब केदारे यांच्या प्रमुख उपस्थितीत नूतन नगर तालुका अध्यक्ष आप्पासाहेब केदारे व जिल्हा कार्याध्यक्ष महेश कुमार शिंदे यांची निवड करून निवडीचे पत्र देण्यात आले. नूतन नगर तालुका अध्यक्ष आप्पासाहेब केदारे व जिल्हा कार्याध्यक्ष महेशकुमार शिंदे यांचा जनसंपर्क दांडगा असल्याने तसेच समाजसेवा करत असल्याने व चर्मकार समाजाच्या नागरिकांचे अनेक प्रश्न सोडवलेले आहे. त्यामुळे ही नियुक्ती करण्यात आली. तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या माध्यमातून चर्मकार समाजाच्या अनेक समस्या सोडवणार असून लवकरच चर्मकार समाजातील युवक व युवतींसाठी नोकरी मेळाव्याचे आयोजन देखील करण्यात येणार असल्याची भावना व्यक्त केली. व या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजाला घरकुलासाठी जागा द्या

## एकलव्य संघटनेच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात व कोरेगाव व वाकोडी या गावात बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्वे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजच्या कुटुंबीयांना ग्रामपंचात हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी. तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड, नाशिक सभापती शिवाजी ढवळे व संपर्कप्रमुख एकनाथ बर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी यांना निवेदन देताना बंडू



बर्डे, शांतीलाल राऊत, विजया गायकवाड, संजय गायकवाड, छाया बर्डे, आशा माळी, विलास बर्डे, सुनिता गायकवाड, नवनाथ गायकवाड, विजय गांगुर्डे आदीसह बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, आदिवासी भिल्ल समाजाचे कोरेगाव व वाकोडी येथे अनेक कुटुंबीय असून त्यांच्या नावे कोणत्याही गावांमध्ये शेतजमीन अथवा घर बांधण्यासाठी जागा नावावर नाही तसेच त्यांची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने जागा विकत घेता येत नाही व उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसल्याने अनेक वेळा उपाशी राहावे लागते त्यामुळे इकडे तिकडे भटकंती करावी लागत असून दिवसातून एक वेळा जेवले की दुसरी वेळ उपाशी राहावे लागते. त्यामुळे या कुटुंबीयांना घरकुलाचा देखील लाभ भेटत नाही. त्यामूळे जागा नावावर करून देण्यासाठी जीआर काढण्यात यावा व देशाचा आदिवासी देशाचा मालक असून त्यांना जागा राहण्यापूर्ती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली असून आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांचे सर्वे करून जागा अथवा गावातील महाराष्ट्र शासनाची जागा नावावर करण्यात यावी व घरकुलाचा लाभ देण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## तलाठी कार्यालयात खाजगी इसम न ठेवण्याच्या आदेशाला केराची टोपली

**● नगर । प्रतिनिधी-**

अनेक तलाठ्यांनी आपल्या हाताखाली शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्तींची परस्पर नियुक्ती केल्या असल्याची तक्रार राज्य लाचलुचपत विभागाच्यावतीने शासनाकडे करण्यात आली होती. महसूल विभागाला तक्रार प्राप्त झाल्यानंतर कक्ष अधिकार्यांच्यावतीने अखेर अशा प्रकारचे वर्तन करणार्या तलाठ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. राज्याच्या अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी सापळा पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी हे त्यांचे शासकीय कामकाज एखाद्या खासगी कार्यालयातून करतात तसेच त्यांची शासकीय कामे करण्यासाठी अनधिकृतपणे खासगी व्यक्तींची नियुक्ती केली आहे. अशा व्यक्तीकडून शासकीय कामे करवून घेतली जातात. तसेच खासगी कार्यालयात शासकीय दस्तावेज ठेवतात. ही बाब कारवाईसाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यानुषंगाने कक्ष अधिकारी यांनी आदेश दिले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामधील तरतुदीनुसार ग्राम महसूल अधिकारी, तलाठी यांची कर्तव्ये व जबाबदार्या नमूद केलेल्या आहेत. सदर कर्तव्य व जबाबदार्या पार पाडताना ग्राम महसूल अधिकारी यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी, अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना, वर्तणूकविषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत. सदर नियमांचे पालन प्रत्येक शासकीय कर्मचारी अधिकारी यांनी करणे आवश्यक असुन शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती, मदतनीस नेमण्याबाबत शासन स्तरावरून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत. तलाठी हे शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती नेमत असतील तर संबंधित तलाठी यांच्याविरूद्ध शासनाच्या सध्याच्या नियमांतर्गत तात्काळ उचित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र या आदेशाला अहिल्यानगर जिल्ह्यासह नगर शहरात व नगर तालुक्यात असलेल्या काही तलाठ्यांनी तिलांजली दिली आहे. अजूनही तलाठी कार्यालयात खाजगी इसम तलाठी कार्यालयात काम करत असल्याचं दिसून येत आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब देवकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देऊन नगर शहरातील सावेडी, नवनागापुर या तलाठी कार्यालयाची तक्रार केली आहे.

## छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सात सेवकांचा सेवानिवृत्ती समारंभ उत्साहात

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**

श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील सात सेवकांचा सेवानिवृत्ती समारंभ जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधा नागवडे यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब भोस होते.




यावेळी सौ. नागवडे म्हणाल्या, सेवानिवृत्त सेवकांनी बापूंच्या विचारांचा वसा आणि वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवून तालुक्यात सुजाण पिढी निर्माण केली. या सेवकांनी विद्यार्थ्यांच्या आयुष्याला सुसंस्कृत वळण देण्याचा प्रयत्न केला. प्रामाणिकपणे शिकवण्याचे कार्य तर त्यांनी केलेच, पण बापूंच्या विचारांना कधीही तिलांजली दिली नाही. या सेवकांनी महाविद्यालय आदर्श बनवण्यासाठी काबाडकष्ट केले. त्यांच्या सेवानिवृत्तीमुळे महाविद्यालयात पोकळी निर्माण होईल, परंतु संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे ही पोकळी भरून काढतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे योगदानाबद्दल संस्थेचे ऋण व्यक्त केले आणि त्यांच्या अनुभवाचा फायदा समाजासाठी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी म्हणाले की, सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केले आणि बापूंचा विश्वास संपादन केला. त्यांच्या ज्ञानाचा फायदा महाविद्यालयाला पुढील काळातही मिळावा, अशी अपेक्षा आहे.

सेवानिवृत्त सेवकांच्या मनोगतात प्राध्यापिका सुनंदा मोरे यांनी बापूंची आठवण काढताना सांगितले, बापूंनी माझ्यावर मुलीसारखे प्रेम केले. मी नागवडे कुटुंबाचीच एक सदस्य आहे, याची जाणीव मला नेहमी झाली. तसेच, सेवानिवृत्त उपप्राचार्य श्री भगवान सोनवणे यांनी बापूंच्या मार्गदर्शनाचा उल्लेख करताना सांगितले, बापूंनी मला विद्यार्थी म्हणून महाविद्यालयात आणले आणि नंतर उपप्राचार्य पदापर्यंत पोहचवले. बापूंचे आचार-विचार त्यांची पुढची पिढी अंमलात आणत आहे. शेवटच्या श्वासापर्यंत मी नागवडे कुटुंबाचा पाईक राहीन.

अध्यक्षीय मनोगतात बाबासाहेब भोस यांनी महाविद्यालयाच्या स्थापनेचा इतिहास सांगितला. ते म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीतही बापूंची समर्पित वृत्ती, राजेंद्रदादा नागवडे यांचे प्रशासन आणि या सेवकांचे योगदान यामुळे महाविद्यालय तग धरून आहे. गरज पडेल तेव्हा या सेवकांनी आपल्या अनुभवाचा फायदा महाविद्यालयासाठी द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला नागवडे कारखान्याचे संचालक विश्वनाथ गिरमकर, लक्ष्मण रायकर, मारुती पाचपुते, विठ्ठल जंगले, प्रा. सुरेश रसाळ, माजी संचालिका सौ. सुरेखा लकडे, सौ. लगड, महाविद्यालयाचे सेवानिवृत्त सेवक, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सुरेश रसाळ यांनी आभार मानले तर सूत्रसंचालन प्रा. शंकर गवते यांनी केले.

# भाजपा पदाधिकाऱ्यांकडून मल्लिकार्जुनेश्वर मंदिराची स्वच्छता

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त राबविला उपक्रम

**● शेवगाव । वीरभूमी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त आमदार मोनिकाताई राजळे यांचे मार्गदर्शनाखाली शेवगाव भारतीय जनता पार्टीच्यावतीने तालुक्यातील घोटण येथील मल्लिकार्जुनेश्वर महादेव मंदिर येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या स्वच्छता अभियानात भारतीय जनता पक्षाचे मंडलाध्यक्ष संजय टाकळकर यांच्यासह तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे प्रतिमापुजन करून मल्लिकार्जुनेश्वराची महाआरती करण्यात आली. यावेळी संजय टाकळकर, भिमराज सागडे, संदीप खरड, रामहरी घुले, लक्ष्मणराव टाकळकर, सरपंच सुधीर पवार, माजी उपसरपंच पिरमहंमद शेख, सरपंच अनिल झिंज, चंद्रशेखर मुरदारे महाराज, एकनाथ खोसे, सुरेश थोरात, जगन्नाथ भगवत, कडुपाटील वडघणे, सतिश गायके, नारायण पाखरे, श्रीरंग गोर्डे, मुरलीधर लोखंडे, अप्पासाहेब औटी, अमोल माने, किरण काथवटे, उमेश धस, बाबासाहेब धस, कल्याणराव शिंदे,



पंकज भागवत तसेच घोटण येथील ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते.

यावेळी मंडलाध्यक्ष संजय टाकळकर म्हणाले, आध्यात्मिकता आणि धार्मिकता हा पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा स्थायीभाव होता. त्या भगवान शंकरांच्या निस्सीम भक्त होत्या. किंबहुना शिवभक्त ही त्यांची फार मोठी ओळख आहे. त्यांनी देशभरात अनेक ठिकाणी महादेवाची मंदिरे उभारली. अहिल्यादेवी यांनी भारताचे धार्मिक भावविश्व केवळ टिकवलेच नाही तर ते बळकट केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर म्हणजे सांस्कृतिक राष्ट्रवाद आणि भारतीय ऐक्याचे अद्भुत उदाहरण आहे. अहिल्यादेवी यांचे जीवनकार्य म्हणजे पाश्चात्य विचारांनी प्रेरित झालेल्या आणि भारताला कायम क्षुद्र समजणाऱ्या बुद्धिवंताना सणसणीत चपराक आहे. मोदी शासनापुर्वीच्या काँग्रेस शासनाने अहिल्यादेवीचे जीवन जाणीवपुर्वक लपवून ठेवले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर माळवा प्रांताच्या (सध्याचा मध्य प्रदेश) शासक होत्या. मात्र त्यांची दृष्टी संपूर्ण भारताला कवेत घेणारी होती. अहिल्यादेवी या भारतीय ऐक्याच्या प्रतीक होत्या आणि आहेत.

भाजपा, महायुतीच्या शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा गौरव करण्यासाठी राज्यात विविध उपक्रम राबविले आहेत. यामुळे अहिल्यादेवींचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहचण्यास मदत होणार आहे.

## दहिगावने विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर

**● शेवगाव । प्रतिनिधी-**

कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली द्वारा संपूर्ण भारत देशात केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान यांचे मार्गदर्शनाखाली कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून खरीप हंगाम पुर्व विकसित कृषि संकल्प अभियानाचे आयोजन दिनांक २९ मे ते १२ जून २०२५ दरम्यान करण्यात येत आहे. या अभियानाचा उद्देश गावोगावी जावून खरीप हंगामाच्या अनुषंगाने शास्त्रज्ञ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन चर्चा करणार आहेत, प्रयोगशील शेतकऱ्यांच्या शेतावर भेटी, शासकीय योजना, आधुनिक कृषि तंत्रज्ञान विषयी जागरूकता मोहीम राबविणे हा आहे. या अभियानामध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषदचे राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्था, बारामती चे शास्त्रज्ञ, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी चे शास्त्रज्ञ, केव्हीके चे शास्त्रज्ञ, आत्मा व कृषि विभाग अहमदनगर, महाराष्ट्र शासनचे अधिकारी तसेच गाव पातळीवर विविध विभागातील अधिकारी सहभागी होऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील श्री. मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेचे कृषि विज्ञान केंद्राद्वारा कार्यक्षेत्रातील ७ तालुके जामखेड, कर्जत, श्रीगोंदा, नगर, पाथर्डी, शेवगाव व नेवासा मधील एकूण ९० गावांमध्ये विकसित कृषि संकल्प अभियान राबविण्याचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. या प्रत्येक गावांमध्ये कृषि रथ जाणार असून शास्त्रज्ञ व अधिकारी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

या अभियानामध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवून शास्त्रज्ञांच्या मार्गदर्शनाचा व शासकीय योजना विषयी माहितीचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषि विज्ञान केंद्र दहिगाव-ने चे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. श्याम सुंदर कौशिक यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# कोपरगावात जागतिक व्यापारी दिन उत्साहात साजरा

## अब वह दिन भी दूर नहीं, कोपरगांव का व्यापार सबसे भारी है : युवानेते विवेकभैय्या कोल्हे

**● कोपरगाव । वीरभूमी –** जागतिक व्यापारी दिनानिमित्त कोपरगांव तालुका व्यापारी महासंघ व कोपरगांव तालुका किराणा मर्चंट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने, शहरातील 'कृष्णाई कार्यालय' येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी उपस्थित राहून व्यापारी बांधवांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमांतर्गत 'ग्राहक जागृती प्रबोधन', 'व्यापारी समस्या चर्चा', 'ज्येष्ठ व्यापारी सन्मान', 'नवउद्योजक सत्कार सोहळा' तसेच अर्धा दिवस आपल्यासाठी या स्तुत्य उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या विशेष प्रसंगी कोपरगांव मधील व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. कार्यक्रमात व्यापारी बाईक रॅलीचाही समावेश होता, तर 'सहकार बास्केट' या नावाच्या मोबाईल प्लिकेशनचे उद्घाटन सुद्धा याच दिवशी करण्यात आले.

आपले मनोगत व्यक्त करताना युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले की, कोपरगांव तालुका व्यापारी महासंघ व किराणा मर्चंट असोसिएशन यांनी अतिशय स्तुत्य उपक्रम राबवले असून, या माध्यमातून ज्येष्ठ व्यापाऱ्यांचा सन्मान आणि नवउद्योजकांचा गौरव करण्यात आला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून कोपरगांव बाजारपेठेने अनेक चढ-उतार अनुभवले आहेत. ब्लॅक अँड व्हाईटच्या जमान्यापासून ते आजच्या डिजिटल युगापर्यंत बाजारपेठेने टिकून राहण्यासाठी ज्येष्ठ व्यापाऱ्यांनी घेतलेले कष्ट अमूल्य आहेत, असेही ते म्हणाले.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या नुकत्याच जाहीर केलेल्या मानांकनानुसार भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर पोहोचली असून, या यशात आपल्या स्थानिक व्यापाऱ्यांचाही वाटा आहे, असे त्यांनी नमूद केले. विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यापाराशी निगडित विविध मुद्यांवर आपली भूमिका मांडताना ऑनलाईन-ऑफलाईन व्यापारातील विसंगती, ग्राहक मानसिकतेतील बदल, शिर्डी-कोपरगांव चखऊचा समावेश, स्मार्ट सिटी संधी गमावणे, तसेच दरडोई उत्पन्न वाढविण्याची आवश्यकता यावर भाष्य केले.

कोपरगांवला कधी काळी कॅलिफोर्निया म्हटले जायचे, मात्र स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी बाजारपेठेला अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. नवउद्योगांना पाणी उपलब्ध नसल्याने अडथळे येत आहेत. यावर सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असे ते म्हणाले.त्यांनी दर महिन्याला व्यापारी संवाद बैठक आयोजित करण्याचा प्रस्ताव मांडला तसेच गुन्हेगारी नियंत्रणात आणण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. व्यापाऱ्यांसाठी हेल्पलाइन क्रमांक सुरु करण्याची गरजही त्यांनी मांडली. डिजिटल ट्रान्झॅक्शनमध्ये भारताचा वाटा ४८% इतका मोठा आहे. त्यामुळे व्यापारात डिजिटल परिवर्तन स्वीकारणे अपरिहार्य आहे. व्यापाऱ्यांसाठी आवश्यक ती सर्व मदत आम्ही करू, याची ग्वाही देतो, असेही ते म्हणाले.



*देश ने दी ललकारी,*
*अब हमारी बारी है,*
*वो दिन भी दूर नहीं,*
*कोपरगाव का व्यापार सब पर भारी है!*

अशा शब्दांत विवेकभैय्या कोल्हे यांनी सर्व उपस्थितांमध्ये ऊर्जा प्रेरित केली. या कार्यक्रमास कोपरगांव परिसरातील मान्यवर, ज्येष्ठ व्यापारी, व्यापारी महासंघाचे पदाधिकारी, युवा व महिला आघाडीच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार आशुतोष काळे, गोदावरीचे दूध संघाचे चेअरमन राजेशआबा परजणे, राज्य पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काकासाहेब कोयटे, राजेंद्रजी बंब, अजितशेठ लोहाडे, तुलसीदास शेठ खुबानी, सुधीर डागा, प्रदीप साखरे, शरदनाना थोरात, केशवराव भवर, बबलूशेठ वाणी, नारायणशेठ अग्रवाल, योगेश बागुल, अनिल जाधव आदी मान्यवर तसेच कोपरगांव तालुका व्यापारी महासंघ, संचालक मंडळ, युवा आघाडी संचालक मंडळ आणि महिला आघाडी संचालक मंडळ उपस्थित होते.

# तिसगाव ते चिचोंडी रस्त्याची दुरुस्ती करा

## परिसरातील ग्रामस्थांनी आ. शिवाजीराव कर्डिले यांचेकडे निवेदनाद्वारे केली मागणी

**● पाथर्डी । प्रतिनिधी–** तिसगाव - मांडवा मार्गे राघोहिवरे चिचोंडीकडे जाणाऱ्या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी तिसगाव, मांडवे, जोडमोहोज, जोहारवाडी या भागातील प्रमुख ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्याकडे केली आहे.



काही वर्षांपूर्वी चिचोंडी ते तिसगाव या १३ किलोमीटर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्यात आले होते. त्यासाठी आमदार कर्डिले यांनी सहा कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. तत्कालीन ग्रामविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते या रस्त्याचा लोकार्पण करण्यात आला होता. त्यानंतर मात्र या रस्त्याची कधीही दुरुस्ती झाली नाही त्यामुळे रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले. रस्ता काही ठिकाणी खचला आहे आणि म्हणून या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी या भागातील नागरिकांच्या वतीने युवानेते कुशल भापसे, भाजपचे गट अध्यक्ष संतोष शिंदे, संचालक अण्णासाहेब वांढेकर, चेअरमन मधुकर वांढेकर, सुनील परदेशी, चेअरमन पुरुषोत्तम आठरे, सरपंच श्रीकांत आटकर, नंदकुमार लोखंडे, विकास सातपुते,एकनाथ लवांडे, प्रनिल सावंत, संभाजी म्हस्के, शुभम सावंत, भारत गोरे, गणेश शिदोरे,संदीप लवांडे, भारत लवांडे, रवींद्र वांढेकर, भाऊसाहेब वाघमारे, शिवाजी जाधव, योगेश शिंदे, हरिचंद्र सावंत, लालासाहेब सावंत,संदीप वांढेकर, ज्ञानेश्वर सावंत, मयूर घुले,ब्रह्मदेव सावंत, अशोक सावंत यांच्यासह खांडगाव जोहरवाडी ग्रामपंचायत, मोहोजखुर्द ग्रामपंचायत, मांडवे ग्रामपंचायत, चिचोंडी ग्रामपंचायत, राघोहिवरे ग्रामपंचायतने देखील पत्रव्यवहार करून या रस्ते दुरुस्तीची मागणी केली आहे. या रस्त्याची अवस्था बिकट झाल्याने या भागातील नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे तसेच छोटे-मोठे अपघातही घडत आहेत.

चिचोंडी येथील आचार्य आनंदऋषीजी यांची जन्मस्थळ व नवीन साकारत असलेले भव्य आनंद तिर्थ, लोहसर येथील भैरवनाथ, कोल्हार येथील कोल्हुबाई देवी मंदिर या तीर्थक्षेत्रांसह जवळचा मार्ग म्हणून पांढरीपुलकडे जाणारी वाहतूकही मोठ्या प्रमाणात या रस्त्याने आहे. नगरला ही पर्यायी मार्ग म्हणून या रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. हा रस्ता या भागातील मुख्य वाहतूक मार्ग आहे त्यामुळे हा रस्ता चांगला होणे गरजेचे आहे. चिचोंडी येथे शिकणाऱ्या पंचक्रोशीतील दररोज ये जा करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी ही हा रस्ता दुरुस्त होणे गरजेचे आहे.

# बालपण कला- आनंद उत्सव स्पर्धा उत्साहात

## ओंकार संगीत निकेतन प्रथम तर स्वानंद महिला संस्था द्वितीय

**● नगर । वीरभूमी–** येथील डॉ. कांकरियांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित भारतातील पहिले ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेले आगळे वेगळे दुसरे बालपण कला-आनंद उत्सव २०२५ स्पर्धा रावसाहेब पटवर्धन स्मारक समिती सभागृह येथे थाटामाटात संपन्न झाल्या. प्रथम पारितोषिक अहिल्यानगर येथील संगीत कलानिकेतन-चैत्रगौरी तर व्दितीय पुणे येथील स्वानंद महिला संघ -मंगळागौरीने पटकावले. तृतीय गीतानंद फौंडेशन- चला सख्यांनो करा, उत्तेजनार्थ एक आमचे आम्ही-येताय ना बाप्पा, उत्तेजनार्थ दोन नाटय आराधना-आली माझ्या घरी ही दिवाळी. अशी माहिती कार्याध्यक्षा डॉ.सुधा कांकरिया यांनी दिली. दुसरे बालपण आनंद उत्सव २०२५ स्पर्धेची सुरूवात सकाळी ९ वाजता ज्येष्ठ कविवर्य चंद्रकांत पालवे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन व नटराज पूजनाने झाली. सदर प्रसंगी संयोजन समितीचे मानकन्हैय्या ट्रस्टचे संचालक डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया, नंदकुमार देशपांडे, सदाशिव मोहिते, रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, गुरूमाऊलीचे चंद्रकांत पंडित, प्रशांत कटके, लेखक चंद्रशेखर जोशी, पुरूषोत्तम जाधव उपस्थित होते. नृत्य विशारद सौ.सुरेखा डावरे, अभिनय क्षेत्रातील नावाजलेले श्री देवीप्रसाद सोहोनी, संगीत क्षेत्रातील तज्ज्ञ श्री अभिजीत आपस्तंब यांनी परिक्षण केले.

डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की दुसरे बालपण २०२५ या स्पर्धेत आठ संघ व ५६ कलाकार सहभागी झाले यात नाटिका, नृत्यनाटिका, संगीत नाटिका यांचा समावेश होता. पारितोषिक वितरण समारंभ स्पर्धा संपल्यानंतर लगेचच करण्यात आले. आपले मनोगत व्यक्त करतांना सौ. सुरेखा डावरे म्हणाल्या की प्रत्येक सादरीकरण सुंदर व बहारदार होते. भारतीय सण आणि उत्सव हा विषय असल्यामुळे नवरात्र, गणपती उत्सव, मंगळागौर, प्रत्येक महिन्यात येणार्या सणांची ओळख, विठोबाची वारी, दिवाळी वगैरे सणांची उत्साहवर्धक सादरीकरण मनाला भावुन गेले. स्पर्धकांच्या वतीने संगीता देऊळगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या की देशातील ही पहिली अत्यंत मार्मिक अशी स्पर्धा आहे. त्यामुळे आम्हाला परत आमचे दुसरे बालपण पुन्हा जगता आले. मानकन्हैय्या ट्रस्टने सुंदर असे संयोजन केले. सर्व स्पर्धकांच्या वतीने हार्दिक अभिनंदन. सुरूवातीस डॉ.सुधा कांकरिया यांनी प्रास्ताविक, डॉ. प्रकाश कांकरिया यांनी स्वागत, सुत्रसंचालन नंदकुमार देशपांडे व प्रशांत कटके तर आभार प्रदर्शन चंद्रकांत पंडित व प्रसाद बेडेकर यांनी केले.

# समान लिंगगुणोत्तरासाठी गावपातळीवर मुलींच्या जन्माविषयी व्यापक जागृती करा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया । गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायदा व आरोग्य विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** जिल्ह्यात मुला-मुलींच्या लिंगगुणोत्तराचे प्रमाण समान राहण्याच्यादृष्टीने गावपातळीवर मुलींच्या जन्माविषयी व्यापक स्वरुपात जागृती करावी. तसेच गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायदा व आरोग्य विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रंसगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण, पोलीस उपअधीक्षक जी. आर. उगले, प्र. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकुमार नेहरकर, जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. सतीष पाटील, महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी सतीष राजुरकर, विधी समुपदेश ॲड. सारीका सुराशे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, जिल्ह्यात मुलांच्या तुलनेत मुलींचे कमी असलेले प्रमाण समान होण्याच्यादृष्टीने अधिकारी, कर्मचाऱ्यांनी दक्षपणे काम करावे. अनाधिकृतपणे गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान करणाऱ्या सोनोग्राफी केंद्राची माहिती घेऊन केंद्राची तपासणी करावी. 'आमची मुलगी' या सार्वजनिक तक्रार प्रणालीबाबतचे माहिती फलक जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, प्राथमिक रुग्णालयात दर्शनी भागात लावण्यात यावेत. लिंगगुणोत्तराची गावनिहाय माहिती एकत्रित करत ज्या गावांमध्ये लिंगगुणोत्तराचे मुलींचे प्रमाण कमी आहे अशा गावांवर लक्ष केंद्रीत करण्यात यावे. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्यांतर्गत न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या खटले गतीने निकाली निघावेत यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पावसाळयात उद्भवणाऱ्या डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया यासारख्या आजाराच्या प्रतिबंधासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात. महानगरपालिका क्षेत्र तसेच लोकसंख्येने मोठ्या असलेल्या गावांमध्ये गृहभेटीचे नियोजन करत नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करून आजारांची पूर्वलक्षणे शोधावी. डास निर्मूलनासाठी किटकनाशक फवारणी, साचलेले पाणी हटवणे आणि निर्जंतुकता राखण्यावर भर द्यावा. खासगी दवाखान्यांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांची माहिती प्रशासनाकडे सादर करण्यात यावी. जिल्ह्यातील जन्म-मृत्यूच्या नोंदीबाबतही कार्यवाही करण्याच्या सूचनाही डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी दिल्या.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चव्हाण यांनी गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व लिंगनिदान प्रतिबंध कायद्यांतर्गत जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामांची माहिती दिली.

### खबरी बक्षिस योजनेंतर्गत १ लाख रुपयांचे बक्षिस

■ बेकायदेशीररित्या गर्भलिंग निदान व लिंग निदान करुन गर्भपात करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध तक्रार देणाऱ्या व्यक्तीस दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी होऊन न्यायालयात गुन्हा दाखल झाल्यास शासनामार्फत एक लक्ष रुपयांचे बक्षिस देण्यात येते. तसेच संशयित केंद्रात गर्भवती महिलेच्या मदतीने स्टींग ऑपरेशन करुन गर्भलिंग निदान व गर्भपात करणाऱ्या डॉक्टरांना रंगेहाथ पकडण्याकरिता शासनास मदत केलेल्या गरोदर महिलेसही शासनामार्फत एक लक्ष रुपयांचे बक्षिस देण्यात येते. जनतेची काही तक्रार असल्यास 'आमची मुलगी' या सार्वजनिक तक्रार प्रणालीच्या १८००२३३४४७५ (१०४) या क्रमांकावर अथवा http://amchimulgimah.in या संकेतस्थळावर तक्रार करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com